# महावितरण

## महाराष्ट्र राज्य विद्युत् वितरण कंपनी मर्यादित

### जाहिरात क्र.     ०३ / २०१०

# *अत्युच्च गुणवत्ता धारक खेळाडूंची विशेष भरती मोहीम*

***विद्युत वितरण क्षेत्रातील अग्रगण्य असणाऱ्या महाराष्ट्र राज्य विद्युत् वितरण कंपनी मर्यादितच्या कार्यालयाच्या कार्यकक्षेत येणाऱ्या कार्यालयातील वेतनगट ३ मधील कनिष्ठ यंत्रचालक संवर्गातील ५४ पदे व वेतनगट ४ मधील कनिष्ठ तंत्रज्ञ संवर्गातील ५४ पदे अत्युच्च गुणवत्ता धारक खेळाडूंमधून सरळ सेवा भरतीद्वारे भरण्याकरिता विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.***

**अर्हता :**

**क)** अंतरराष्ट्रीय किंवा राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धामध्ये खालील नमूद केलेल्या खेळात / क्रीडेत राज्य किंवा राष्ट्राचे प्रतिनिधित्व केलेला /केलेली पुरुष/ महिला क्रीडापटू.

**ख)** खाली नमूद केलेल्या खेळांच्या वैयक्तिक अथवा सांधिक क्रीडा स्पर्धामध्ये किमान राज्य अजिंक्यपद स्पर्धेत प्रथम, द्वितीय व तृतीय स्थान प्राप्त करणारा किंवा सुवर्ण, रौप्य किंवा कास्य पदक प्राप्त करणारा खेळाडू. राज्य अजिंक्यपद स्पर्धा या सदर खेळांच्या महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनसी संलग्न असलेल्या अधिकृत राज्य संघटनेने आयोजित केलेल्या असाव्यात अथवा महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनने स्वत: आयोजित केलेल्या असाव्यात. किमान प्राविण्यापेक्षा उच्च स्तरावरील क्रीडा प्राविण्य मिळविणाऱ्या उमेदवारास प्राधान्य राहील. वैयक्तिकरित्या किंवा आमंत्रित स्वरुपाच्या स्पर्धांमध्ये भाग घेतलेल्या खेळाडूंचा विचार केला जाणार नाही.

**ग)** राष्ट्रीय छात्रसेनेमध्ये (NCC) अंडर ऑफिसरची रँक मिळवून राष्ट्रीय छात्रसेनेच्या खालील नमूद केलेल्या खेळांच्या राष्ट्रीय स्पर्धांमध्ये पदके प्राप्त केलेली व्यक्ती.

**क्रीडा प्रकार :**

(१) ॲथलेटिक (ट्रॅक आणि फिल्ड प्रसंगासह), (२) बॅडमिंटन, (३) बास्केटबॉल, (४) ब्रिज (५) कॅरम, (६) क्रिकेट, (७) कबड्डी , (८) खोखो, (९) टेबलटेनिस, (१०) बुध्दीबळ (चेस) आणि (११) कुस्ती

**खेळाडूंची कामगिरीविषयक प्रमाणपत्रे शासन निर्णय क्र. राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक ३० एप्रिल,२००५ चे परिशिष्ट - "ब" येथे दिलेल्या प्राधिकाऱ्याने विहित नमुन्यात घेऊन संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी प्रमाणित केलेली असावीत.**

## वेतनश्रेणी व एकूण अंदाजे पगार

| अ.क्र. | पदाचे नाव | वेतनश्रेणी | एकूण अंदाजे पगार |
|---|---|---|---|
| १ | **कनिष्ठ यंत्रचालक** | ९०२०-२२०-१०१२०-२९५-१३०७०-३२५-२२४९५ | रु. १४४२९/- |
| २ | **कनिष्ठ तंत्रज्ञ** | ८०४०-१५५-८८१५-१८५-१०६६५-२२०-१५७२५ | रु. १२७६०/- |

**दिनांक २४ / ०७ / २०१० रोजी शैक्षणिक अर्हता**

| अ.क्र. | पदाचे नाव | अर्हता |
|---|---|---|
| १ | **कनिष्ठ यंत्रचालक** | शिकाऊ उमेदवार अधिनियम, १९६१ अन्वये राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी पूर्ण झाल्यानंतर राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद, नवी दिल्लीकडून देण्यात येणारे शिकाऊ उमेदवारी प्रमाणपत्र किंवा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील व्यवसाय पाठयक्रम पूर्ण झाल्यानंतर वरील संस्थेकडून देण्यात येणारे वीजतंत्री/तारतंत्री व्यवसायातील राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण प्रमाणपत्र. |
| २ | **कनिष्ठ तंत्रज्ञ** | |

**टिप :-** उपरोक्त शैक्षणिक अर्हताधारक गुणवंत खेळाडू पुरेशा संख्येने उपलब्ध होऊ शकले नाहीत तर जे अत्युच्च गुणवत्ता धारक खेळाडू किमान एस. एस. सी. पास आहेत अशा खेळाडूंचा कनिष्ठ तंत्रज्ञ पदाकरिता विचार करण्यात येईल, अशा खेळाडूंची निवड झाल्यास त्यांना कंपनीकरिताचा आय.टी.आय. चा एक वर्षाचा कोर्स (ITI Sandwich Course) स्वखर्चाने पुर्ण करावा लागेल. सदरचा कोर्स यशस्वीपणे पुर्ण केल्यानंतरच त्यांची **कनिष्ठ तंत्रज्ञ** या पदी नेमणूक करण्यात येईल.

**दिनांक २४ / ०७ / २०१० रोजी आवश्यक अनुभव**

| अ.क्र. | पदाचे नाव | अनुभव |
|---|---|---|
| १ | **कनिष्ठ यंत्रचालक** | वीजतंत्री/तारतंत्री व्यवसायातील १ वर्षाचा अनुभव |
| २ | **कनिष्ठ तंत्रज्ञ** | अनुभवाची आवश्यकता नाही |

**दिनांक २४ / ०७ / २०१० रोजी वयोमर्यादा**

दिनांक २४ / ०७ / २०१० रोजी वयोमर्यादा किमान १८ वर्षे पुर्ण व कमाल वय ३० वर्षे असावे. मागासवर्गीयांसाठी कमाल वयोमर्यादा ५ वर्षे शिथिलक्षम राहील.

**<u>महत्वाच्या तारखा व वेळापत्रक :</u>**

अर्ज पाठविण्याची अंतिम तारीख : २४ / ०७ / २०१०

उमेदवारांची थेट मुलाखतीसाठी सक्षिप्त यादी
संकेत स्थळावर घोषित करण्याची तारीख : १६ ऑगस्ट, २०१०

मुलाखतीची तारीख : ०१ ते १५ सप्टेंबर २०१० दरम्यान

**<u>सर्वसाधारण अटी :-</u>**

१) महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागासप्रवर्ग व इतर मागासवर्ग यासाठी आरक्षण अधिनियम, २००१ (सन २००४ च्या महाराष्ट्र अधिनियम क्र. ०८) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक २९/०१/२००४ पासून अंमलात आणला आहे. सदर अधिनियमानुसार फक्त अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांना सोडून उर्वरित मागासवर्गातील सर्व जाती प्रवर्गातील म्हणजे वि.जा. (अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), वि.मा.प्र., इतर मागासवर्ग याना उन्नत/प्रगत गटाचे (क्रिमिलेअर) तत्व लागू केले आहे. त्या प्रवर्गातील उमेदवारांनी जात उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे दिनांक ०१/०४/२०१० नंतरचे किंवा जाहिरातीच्या दिनांकास वैध असलेले नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र धारण केले असले पाहिजे.

२) ***खुल्या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ति/कुटुंबातील (क्रिमीलेअर) खेळाडू सदस्यांना खेळाडूंसाठी असलेले आरक्षण आनुज्ञेय राहणार नाही. खुल्या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती व गट (क्रिमीलेअर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र शासनाने जाहीर केलेल्या सक्षम प्राधिका-याचे असावे.***

३) मागास प्रवर्गातील उमेदवारांनी जातीच्या दाखल्याबरोबरच जात पडताळणी समितीने वैध ठरविलेले **"जाती वैधता प्रमाणपत्र"** सादर करणे आवश्यक आहे. शासन परिपत्रक क्र. बीसीसी-२००९/प्र.क्र.२९१/०९/१६-ब, दिनांक ५ नोव्हेंबर २००९ नुसार जाती वैधता प्रमाणपत्र सादर केल्यानंतर नियुक्ती देण्यात येईल. मात्र संबंधित उमेदवाराने निवडसूची वैधते पर्यंत जाती वैधता प्रमाणपत्र सादर करणे ही सर्वस्वी सदर उमेदवाराची जबाबदारी राहील.

४) शासकीय / निमशासकीय / महामंडळ तसेच इतर वीज कंपन्यांमध्ये कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांनी त्यांच्या विभागामार्फत / योग्य अधिकारी वर्गामार्फत अर्ज करावा. **अशा उमेदवारांची निवड झाल्यास त्यांच्या पूर्वीच्या कंपनीच्या / संस्थेच्या सेवेची कोणतीही जबाबदारी घेण्यात येणार नाही.**

५) महाराष्ट्र सिव्हील (Declaration of Small Family) अधिनियम, २००५ अंतर्गत विहित केलेल्या छोटे कुटुंब व्याख्यांमध्ये मोडणे ही एक आवश्यक पात्रता आहे.

## <u>अर्ज करण्याची पध्दत</u> :

१) उमेदवाराने विहित नमुन्यातील अर्जावर विहित ठिकाणी एक पासपोर्ट साईज फोटो लावावा व अर्ज पोस्ट बॉक्स नंबर **८५९२, कांदिवली (पूर्व), मुंबई ४०० १०१ येथे दिनांक २४ जुलै,२०१०** पर्यंत पोचतील असे साध्या टपालाने पाठवावेत. उमेदवारांनी पाठविलेल्या अर्जाची छायांकित प्रत स्वतः जवळ ठेवावी. **पोस्टाच्या विलंबास कंपनी जबाबदार राहणार नाही.**

२) अर्जासोबत शैक्षणिक अर्हता, वय, अनुभव तसेच जातीचा दाखला इत्यादी प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे. सदर प्रती केंद्र/राज्य शासनाचे राजपत्रित अधिकारी, पोष्टमास्तर, मुख्याध्यापक व याबाबतीत प्राधिकृत व सक्षम अधिकाऱ्यांनीच साक्षांकित केलेल्या असाव्या. तसे नसल्यास किंवा चुकीची माहिती असल्यास अर्ज अपुर्ण समजून नाकारला जाईल.

३) अर्जासोबत खेळाडूंची कामगिरी विषयक प्रमाणपत्रे शासन निर्णय क्र. राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/ क्रीयुसे-२ दिनांकः ३० एप्रिल, २००५ चे परिशिष्ट - ब येथे दिलेल्या प्राधिकाऱ्याने विहित नमुन्यात घेऊन संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी प्रमाणित केलेली जोडणे आवश्यक आहे.

४) शासकीय / निमशासकीय महामंडळ, इतर वीज कंपनीमधील कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज त्यांचे कार्यालय प्रमुखांच्या परवानगीने भरावे व अशा परवानगीची प्रत अर्जासोबत जोडावी.

## <u>निवड पध्दती :</u>

अर्ज छाननीत पात्र ठरलेल्या उमेदवारांची वैयक्तिक मुलाखत घेण्यात येईल. वैयक्तिक मुलाखतीस बोलविलेल्या पात्र उमेदवारांची यादी कंपनीच्या संकेत स्थळावर www.mahadiscom.in वर उपलब्ध करुन देण्यात येईल. उमेदवारांना मुलाखतीकरीता स्वतंत्रपणे अवेदन पत्र पाठविण्यात येणार नाहीत.

**<u>इतर अटी :</u>**

१) जाहिरातीत दर्शविण्यात आलेली अर्हता ही किमान अर्हता आहे आणि केवळ ही किमान अर्हता हाच निकष मानून उमेदवार संबंधित पदाच्या निवडीसाठी पात्र ठरु शकणार नाही.

२) अर्ज करणाऱ्या प्रत्येक उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे. उमेदवार हा महाराष्ट्रातील अधिवासी (Domicile) असला पाहिजे.

३) निवड झालेले उमेदवार कंपनीच्या सेवेत रुजू झाल्यानंतर त्यांना मुळ वेतना व्यतिरिक्त महागाई भत्ता, घरभाडे भत्ता व इतर भत्ते इत्यादी कंपनीच्या नियमांप्रमाणे मिळण्यास पात्र ठरतील.

४) भरती प्रक्रिये दरम्यान जर एखाद्या उमेदवारांनी सादर केलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास अशा उमेदवाराचा अर्ज भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यात अपात्र ठरविण्यात येईल.

५) जाहिरातीतील पदांची भरती प्रक्रियेबाबतचा कंपनीचा निर्णय अंतिम असून त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार वैयक्तिक पातळीवर कोणाशीही केला जाणार नाही.

६) भरती प्रक्रियेत प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष प्रचार / हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केल्याचे निदर्शनास आल्यास अशा उमेदवाराचा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.

७) निवड केलेल्या उमेदवारास कंपनीच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही कार्यालयाच्या ठिकाणी रिक्त पदाच्या उपलब्धतेनुसार नियुक्त करण्यात येईल, याबाबत कंपनीचा निर्णय अंतिम राहील.

८) निवड झालेल्या उमेदवाराने नियुक्तीच्या ठिकाणी स्वखर्चाने जाऊन रुजू होणे आवश्यक राहील.

९) जाहिरातीत बदल किंवा जाहिरातीच्या काही भागात अंशतःबदल किंवा संपुर्ण जाहिरात रद्द करण्याचे अधिकार हे कंपनी राखून ठेवीत आहे व सदरचा निर्णय कोणत्याही प्रकारे उमेदवारास कळविला जाणार नाही.

१०) **निवडीच्या कोणत्याही टप्प्याला उमेदवार विहित अर्हता / अनुभव धारण करीत नसल्याचे किंवा त्याचे पूर्वीचे चरित्र गैरवर्तणूकीचे आढळल्यास त्याची उमेदवारी / नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर रद्द होईल. तसेच अशा उमेदवाराची नियुक्ती झाल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.**

११) निवड सूचीची विधी ग्राह्यता (Validity) निवडीच्या तारखेपासून एक वर्षाची राहील. त्यानंतर ही निवड सूची नियमाप्रमाणे व्यपगत होईल.

********

# अर्जाचा नमुना

________________________________ या पदासाठी अर्ज

येथे स्वतःचा फोटो चिकटवावा

१. संपूर्ण नाव : __________ __________ __________

आडनाव स्वतःचे नाव पतीचे/वडिलांचे नाव

२. पत्रव्यवहाराचा पत्ता : ______________________________

______________________________

३. मोबाईल नं. : ______________________________

४. Email ID : ______________________________

५. लिंग : ______________________________

६. जन्म तारीख : ______________________________
(एस.एस.सी.प्रमाणपत्राप्रमाणे)

७. दिनांक २४ / ०७ / २०१० रोजी वय ☐☐☐☐ ☐☐ ☐☐

वर्षे महिने दिवस

८. राष्ट्रीयत्व :

९. अर्जदार महाराष्ट्राचा अधिवासी आहे काय :

१०. जातीचा प्रवर्ग : (योग्य ठिकाणी ( ✔ ) अशी खूण करावी)

| अजा | अ.ज. | वि.जा.अ. | भ.ज.ब. | भ.ज.क. | भ.ज.ड | वि.मा.प्र. | इ.मा.व. | सर्वसाधारण/खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

११. क्रीडा प्रकार : ____________________

१२. प्राविण्य मिळविलेला तपशील : ____________________

१३. खेळाडूंची कामगिरीविषयक प्रमाणपत्र शासन निर्णय क्र. राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक ३० एप्रिल,२००५ चे परिशिष्ट - ब येथे दिलेल्या प्राधिकाऱ्याने विहित नमुन्यात दिलेले आणि संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी प्रमाणित केलेले सोबत जोडल आहे काय ? : होय / नाही

१४. शैक्षणिक अर्हता :

| उत्तीर्ण केलेली परीक्षा | विद्यापीठ/मंडळाचे नाव | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | विषय | टक्केवारी/श्रेणी |
|---|---|---|---|---|
| | | | | |

१५. अनुभव :

| संस्थेचे नाव व पत्ता | कालावधी | | एकूण वर्ष | सेवा सोडण्याचे कारण |
|---|---|---|---|---|
| | पासून | पर्यंत | | |
| | | | | |

१६. आज रोजी मला _________(संख्या) इतकी मुले हयात आहेत.त्यापैकी दि.२८ मार्च २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ________इतकी आहे. (असल्यास जन्मदिनांक नमूद करावा).हयात असलेल्या मुलांची संख्या त्यापेक्षा अधिक असेल तर दि.२८ मार्च २००५ व तद्‌नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी अर्हता ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

वर नमूद केलेली सर्व माहिती खरी असून ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल आणि माझे विरुध्द कायदेशीर कारवाई होईल याची मला जाणीव आहे.

**ठिकाण :**

**दिनांक :**

**(उमेदवाराची सही)**

- अर्जासोबत खालील (छायांकित ) सत्यप्रती जोडलेल्या आहेत.

१)
२)
३)
४)
५)
६)